# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

## कन्यादान ठेव योजना

१. ही ठेव योजना फक्त १० वर्ष वयाच्या आंतील मुलींच्या नावाने उघडण्यात येईल.

२. सदरची ठेव योजना सभासदांच्या १० वर्षा पर्यंत वयाच्या मुलींसाठी लागु राहील.

३. सदर खात्यात मुलींचे कमाल वय १४ वर्षे होई पावेतो रिकरींग ठेव स्वरुपात किमान रु.३०० व कमाल रु.१००० दरमहा याप्रमाणात रक्कम जमा करता येईल.

४. एका सभासदास जास्तीत जास्त दोन मुलींकरीता ही ठेव योजना लागू राहील.

५. या ठेव योजनेतील मुलीचे वय १४ वर्षे पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीसाठी रक्कम ठेव खात्यात जमा करता येणार नाही.

६. हया ठेव योजनेतील अंतीम रक्कम ही मुलीचे २१ वर्षे पुर्ण झालेवर देय होईल.

७. मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतरच मुलींच्या शैक्षणिक कारणासाठी जमा रक्कमेच्या ५०% व विवाहासाठी पुर्ण रक्कम या ठेव योजनेतुन काढता येईल.

८. या ठेव योजनेसाठी ९% इतका व्याजदर राहील. सदरच्या व्याजदराने व्याज रक्कम दर आवश्यक कागदपत्र तिमाहीस ठेव खात्यावर जमा करण्यात येईल.

९. या ठेव खात्यात दरमहा रक्कम जमा करणे अनिवार्य राहील. ज्या महिन्यात रक्कम जमा होणार नाही त्यास २५ रुपये दंडासह मासिक हप्ता रक्कम भरुन खाते नियमित करता येईल.

१०. या ठेव योजनेसाठी मुलींचा जन्म दाखला, फोटो, पालक (आई किंवा वडील) यांचे फोटो ओळखपत्र (आधारकार्ड), निवास पत्ता इ. कागदपत्रे आवश्यक आहे.

११. योजना दरम्यान दुर्देवाने मुलीचे निधन झाल्यास सदरची रक्कम तिच्या पालक (आई किंवा वडीलांना) अदा करण्यात येईल.

१२. योजना दरम्यान दुर्देवाने पालक (आई किंवा वडील) यांचे निधन झाल्यास मुलीला खाते बंद करता येईल किंवा त्यापुढील सर्व हप्ते बँकेमार्फत भरण्यात येवुन मुदतीनंतर रक्कम मुलीस अदा करण्यात येईल.

१३. अज्ञान पालक (आई किंवा वडील) या दोहोंपैकी कोणीही सदर ठेव खातेवर व्यवहार करु शकेल.

१४. या ठेवयोजनेत जमा रक्कमेबाबत पासबुक देण्यात येईल सदरचे पासबुक भरल्यानंतर पुनश्चः दुसरे पासबुक भरुन देण्यात येईल. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र पासबुक गहाळ झाले किंवा हरवले तर रुपये २५ डुप्लीकेट पासबुक फी म्हणुन शुल्क आकारले जाईल.

**वरील नियमावली संचालक मंडळ सभा दि.०९/१२/२०१७ विषय क्र. १२ अन्वये मंजुर. सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/०१/२०१८ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| (प्रकाश क्षीरसागर) | (दिपक आहिरे) | (दिलीप थेटे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |